# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०४/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक ०३/०४/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी अजिज समिर पटले वय ३० वर्ष, रा. करडी यानी आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ टी ८५१८ किंमती १५,०००/–रु. ची ही प्रफुल यादवराव गायधने यांचे घराचे मागे लॉक लावुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणाही नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चा लॉक तोडुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहे.

**२) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक ०६/०४/२०१७ चे २०.०० ते २३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी स्वपनील वसंत पातोडे वय २८ वर्ष, रा. कुर्झा यांनी आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही ७७९४ किंमती ६७,५००/–रु. ची नेवारे रा. गोसे खुर्द यांचे पानटपरीचे शेजारी पार्कीग करुन लॉक करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणाही नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चा लॉक तोडुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन लाथाबुक्यांनी मारपीट, शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ०३/०४/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आरोपी चा सासरा लागत असुन फिर्यादी हा जनावरे चारुन घरी आला असता आरोपीने फिर्यादी सोबत घरघुती कारणावरुन भांडण करुन लाथाबुक्यांने फिर्यादीचे डाव्या हातावर, छातीवर, पाठीवर मारपीट करुन वाईट शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली वैदयकीय परीक्षणा अंती फिर्यादीचे डाव्याहाताची बोटे फॅक्चर असल्याचे वैदयकीय अभिप्राय प्राप्त झाल्याने फिर्यादी मारोती मयाराम शरणागत वय ५५ वर्ष, रा. मुरली यांचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२५,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. चिचखडे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहे.

**३) ट्रॅव्हल्स चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल चालकास जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०४/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील जखमी गुलाब मोतीराम बन्सोड वय ५० वर्ष, रा. मुजबी हा आपले सायकलने एनएच ०६ रोडने भंडारा कडे येथे असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅव्हल्स हयगयीने, निष्काळजीपणे, लापरवाहीने व वेगाने चालवुन जखमीचे सायकलला धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी धम्मरत्न शंकर बन्सोड वय ३० वर्ष, रा. मुजबी यांचे तोडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे.

४) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी . :—

दिनांक ०४/०४/२०१७ चे ११.३० वा. दरम्यान यातील जखमी क्र. १ दिलीप देशभ्रतार वय ५० वर्ष, २ हंसा मोटघरे दोन्ही रा. पेट्रोल पंप हे जखमी क्र. २ चे ॲक्टीव्हा गाडी क्र. एमएच ३६ ओ ०२५५ यावर बसुन पेट्रोलपंप कडुन कारधाकडे डब्बल सिट जात असतांना यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन लापरवाहीने, निष्काळजीपणे चालवुन अशोक नगर गावातुन एनएच ६ रोडवर येत असतांना ॲक्टीव्हा मोटार सायकलला धडक मारुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सचिन बाबुलाल गेडाम वय २६ वर्ष, रा. अशोक नगर फुलमोगरा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

५) मुलीचा साक्षगंध होवुन हुंडया मागणी करुन लग्नास नकार दिल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २२/०३/२०१७ ते ०८/०४/२०१७ चे १४.०० वा. पावेतो. यातील फिर्यादी यांची मुलगी वय ३० वर्ष, हीचे लग्न आरोपी क्र. १ सोबत जमले असुन साक्षगंध झाले नंतर आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करुन लग्नामध्ये मोटार सायकल व सोन्याचा गोप व फिर्यादीचे मुलीने उचलेले दोन लाख रु. म्हणुन लग्नास नकार दिल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३,४ हुंडा प्रतीबंधक कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :—

दिनांक ११/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे जवाहरनगर, आंधगाव व साकोली येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५५ लिटर हातभट्टी दारु + १ मोटार सायकल किंमती १२,७५०/—रु. ४ लिटर ३२० मिली लिटर देशी दारु किंमती १२००/—रु. असा एकुण १३,९५०/—रु. जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता